पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/ २७ /२०१६
दिनांक : १५/०१/२०१६

प्रति,

मा......................................
सदस्य, शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा दिनांक **१९/०१/२०१६** रोजी आयोजित केलेबाबत...

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा मंगळवार दिनांक **१९/०१/२०१६** रोजी दुपारी **३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

मा.कळावे,

आपला विश्वासू,



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.शहर सुधारणा समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – ९**

दिनांक : **१९/०१/२०१६** वेळ : दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा मंगळवार दिनांक **१९/०१/२०१६** रोजी दुपारी **३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

---------

दिनांक ०५/०१/२०१६ रोजी झालेल्या सभेचा **( कार्यपत्रिका क्रमांक ८)** सभावृत्तांत कायम करणे.

----------

विषय क्र.१) मौजे पिंपळे गुरव भागाची विकास योजना महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, यांचेकडील अधिसुचना क्र.TPS/1893/1276/CR-1974/93/UD-13 दि. १८ सप्टेंबर १९९५ अन्वये शासनाकडून मंजूर करणेत आली आहे. सदर विकास योजनेनुसार मौजे पिंपळे गुरव येथील स.नं.७९ पैकी व ८० पैकी जागेत आरक्षण क्र.३५६, “ प्राथमिक शाळा विस्तार ” प्रस्तावित केलेले आहे. सदरचे आरक्षण डी.पी.रिपोर्टनुसार सुमारे १५००.०० चौ.मी. क्षेत्रावर आहे. प्रत्यक्षात मंजूर विकास आराखडयात दर्शविलेनुसार सदरचे क्षेत्र सुमारे २५००.०० चौ.मी. क्षेत्रावर असून त्यापैकी ५००.०० चौ.मी. क्षेत्रावर शाळा विकसित आहे. सदर आरक्षणचे जागेपैकी सुमारे ९००.०० चौ.मी. क्षेत्र टि.डी.आर.च्या बदल्यात महानगरपालिकेच्या ताब्यात सद्यस्थितीत आलेले आहे. ताब्यात नसलेल्या क्षेत्रावर अनधिकृत बांधकामे आहेत. आरक्षणाचे उर्वरित क्षेत्र टि.डी.आर. किंवा खाजगी वाटाघाटीने मोबदला अदा करणेच्या बदल्यात महानगरपालिकेच्या ताब्यात मिळणेकरीता प्रयत्न करणेत आलेले आहे. सदर आरक्षण विकसित करणे आवश्यक असल्याबाबत स्थानिक प्रतिनिधी या विभागाकडे मागणी करीत आहे. त्यामुळे उर्वरित क्षेत्र भूसंपादनाने संपादीत करता येवु शकते. त्यामुळे सदर आरक्षण पूर्णपणे विकसित करता येईल. केंद्र शासनाने **“ The Right to fair compensation and Transparency in land acquisition, Rehabilitation Resettlement Act 2013 ”** हा नवीन भूसंपादन कायदा तयार केला असून दि. १ जानेवारी २०१४ पासून सदर कायदा अंमलात आला आहे. तरी उपरोक्त प्रस्तावित आरक्षणाखालील जमीन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व नवीन भूसंपादन कायदा अन्वये संपादन करणेकामी सदर आरक्षणाचा भूसंपादन प्रस्ताव

मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठविणेस मान्यता मिळणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

**( दिनांक १९/०१/२०१६ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे )**

विषय क्र.२) मा.आरती चोंधे, मा.अमिना पानसरे यांचे प्रस्तावानुसार पिंपरी चिंचवड महानगरनपालिका हद्दीतील मौजे आकुर्डी मंजूर विकास योजना आराखडयात स.नं.१७९ पैकी मध्ये आरक्षण क्र.२७३ हे प्राथमिक शाळा आरक्षण असून आरक्षणातील क्षेत्रामध्ये सुमारे ४०० कुटुंबे राहतात. या आरक्षणामधील जागेत आरक्षण मंजूर होण्याअगोदर पासून घरे आहेत. तसेच या आरक्षणाचे आजूबाजूला म्हणजेच अर्धा ते एक किलोमीटरचे अंतरात १३ ते १४ शाळा आहेत व महानगरपालिकेची श्री.वसंतदादा पाटील माध्यमिक विद्यालय हे या प्रभागात आहे. त्यामुळे मंजूर विकास योजनेतील स.नं.१७९ पैकी मधील अरक्षण क्र.२७३ ची आवश्यकता नाही. म्हणून मंजूर विकास योजनेतील स.नं.१७९ पैकी मधील आरक्षण क्रमांक २७३ महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये रद्द करुन सदर आरक्षणातील क्षेत्र रहिवासी विभागात समाविष्ट करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

**( दिनांक १९/०१/२०१६ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे )**

विषय क्र.३) मौजे पिंपळे निलख भागाची विकास योजना महाराष्ट्र शासन, नगरसचिव विभाग, यांचेकडील अधिसुचना क्रं.टीपीएस-१८९३/१२७६/सी.आर-१७४/युडी-१३. दि.१८/०९/१९९५ अन्वये शासनाकडुन मंजुर करणेत आली आहे. सदर विकास योजनेनुसार मौजे पिंपळे निलख येथील स.नं. २७ व २८ मध्ये ४५.०० मी.रूंद रस्ता, २४.०० मी.रूंद रस्ता, आरक्षण क्र.३८८ व ३८९ शॉपिंग सेंटर व या शॉपिंग सेंटर आरक्षणा लगत १२.०० मी. रूंद रस्ता प्रस्तावित केलेला आहे.सद्यस्थितीमध्ये स.नं. २७ व २८ मधून जाणा-या नाशिक फाटा – वाकड या बीआरटीएस रस्त्याचे काम पुर्ण झालेले आहे.तसेच वाकड – वाय जंक्शन - औंध या २४.०० मी. रूंद रस्त्याचे कामही पुर्ण झाले आहे.सध्या सदर भागाचा विकास झपाट्याने होत आहे.सदर ठिकाणचे आरक्षण क्र.३८८ व ३८९ शॉपिंग सेंटर हे आरक्षण विकसित करणेकरीताही १२.०० मी.रस्त्याची अत्यंत आवश्यकता आहे.तसेच वाहतुकीच्या नियोजनाच्या दृष्टीने नाशिक फाटा – वाकड हा बीआरटीएस ४५.०० मी. रूंद रस्ता व वाकड – वाय जंक्शन - औंध या २४.०० मी. रूंद रस्ता हे दोन्ही रस्ते १२.०० मी.रूंद डी.पी. रस्त्याने जोडणे आवश्यक आहे. तसेच मा.नगरसदस्यांची वारंवार मागणी आहे की मौजे पिंपळे निलख येथील स.नं.२७ व २८ मधील १२.०० मी. रूंद रस्त्याची जागा लवकरात लवकर मनपाने ताब्यात घेऊन विकसित करावा म्हणजे ४५.०० मी. व २४.०० मी. रूंद रस्ते जोडले जाऊन वाहतुकीच्या दृष्टीने उपयुक्त होईल.तसेच सदर रस्त्यालगत असणारे शॉपिंग सेंटरचे आरक्षणही विकसित करता येईल. तरी सदर रस्त्याचे जागेच्या भुसंपादनाचा प्रस्ताव तयार केलेला असुन सदर भुसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी पुणे यांचेकडे

पाठवावा लागणार आहे. सदर भुसंपादन प्रस्ताव पाठविणे कामी मा.शहर सुधारणा समितीमार्फत मा.महापालिका सभेची मान्यता आवश्यक आहे. केंद्र शासनाने “The Right to fair compensation and Transparency in land acquisition ,Rehabilitation Resettlement Act 2013” हा नविन भूसंपादन कायदा तयार केला असून दि.०१/०१/२०१४ पासुन सदरचा कायदा अंमलात आला आहे.तरी उपरोक्त प्रस्तावित आरक्षणाखालील जमिन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व नविन भूसंपादन कायदा अन्वये संपादन करणेकामी सदर आरक्षणाचा भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाअधिकारी, पुणे यांचेकडे पाठविणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/ २७ /२०१६
दिनांक : १५/०१/२०१६ चे लगत.

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेट्स) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.